## प्रेसनोट

# " महाराष्ट्र पोलीस यांचा रेझींग डे"

जा.क्र. ०३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०१/२०१८

महाराष्ट्र शासनाने २ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र पोलीस दलाचा " रेझींग डे" दिवस म्हणुन मान्यता दिली आहे. यानिमीत्त भंडारा पोलीस दलातर्फे दिंनाक २ जानेवारी ते ६ जानेवारी, २०१८ या कालावधी मध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत. या कार्यक्रमा अंतर्गत पोलीसांनी गुन्हेगारांना सजा होण्याकरीता गुन्हे तपासात सुसुत्रता आणने, तसेच पोलीस दलातर्फे या दरम्यान महाराष्ट्रातील नागरींकांना विशेष करुन महिला, जेष्ठ नागरीक, लहान मुले, अल्पसंख्याक यांना सुरक्षित वातावरण देण्याचा पुरेपुर प्रयत्न करणे या गोष्टीचा समावेश करण्यात आलेला आहे.

याकरीता दिंनाक २ जानेवारी ते ६ जानेवारी या कालावधीत खालील प्रमाणे कार्यक्रम आयोजीत केलेले आहे.

१) दिंनाक २ जानेवारी २०१८ :— भंडारा जिल्हयातील प्रत्येक पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांनी त्यांच्या हद्दीतील शाळा कॉलेजला भेटी देवुन विद्यार्थ्यांना सोशल मिडीया अवेअरनेस बाबत माहिती देणे.

२) दिंनाक ३ जानेवारी २०१८:— शाळकरी मुला — मुलींना पोलीस स्टेशन मधील दैनंदिन कामकाजाबाबत माहिती देणे, पोलीस स्टेशनला विवीध शस्त्राबाबतची प्रदर्शनी राबवुन माहिती देणे, तसेच वाहतुक नियमावली या संदर्भात सुध्दा माहिती देऊन जनजागृती करण्याबाबत.

३) दिंनाक ४ जानेवारी २०१८ :— मुलींना महिला विषयक कायदे व सुरक्षा संबंधात कार्यक्रम आयोजीत करण्यात येत आहे.

४) दिंनाक ५ जानेवारी २०१८ :— पोलीस स्टेशन हद्दीत जेष्ठ नागरीक याची पोलीस स्टेशन मध्ये बैठक आयोजीत करुन समस्या व सुरक्षा संबंधात चर्चासत्र आयोजीत करणे. मुलींना महिला विषयक कायदे व सुरक्षा संबंधात कार्यक्रम आयोजीत करण्यात येत आहे.

५) दिंनाक ६ जानेवारी २०१८ ला कोर्टातुन निकाली लागलेल्या सर्व गुन्हयाचा मुद्देमाल परत करण्यासंबंधी विशेष मोहीम राबविण्यात येईल.

पोलीस अधिकारी व कर्मचारी, होमगार्ड, शाळा व कॉलेज मधील मुले— मुली यांचे सोबत भंडारा शहरात पोलीस बॅन्डचे पथसंचालन करण्यात येईल.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.